जा.क्र.प्राफसंके/रोवा/ 379 /२०२२
प्रादेशिक फळ संशोधन केंद्र, वेंगुर्ला
दिनांक :– 10 FEB 2022

प्रति,

**विषय** :– सुपारी पिकाच्या श्रीवर्धनी वाणाचे बियाणे पुरविणेसाठी दरपत्रक देणेबाबत......

महोदय,

प्रादेशिक फळ संशोधन केंद्र वेंगुर्ला कार्यालयाच्या रोपवाटिका विभागास खालीलप्रमाणे सुपारी पिकाच्या श्रीवर्धनी वाणाचे बियाणे खरेदी करावयाचे असून याबाबत आपणास विनंती करण्यात येते की, खाली नमूद केल्यानुसार सुपारी पिकाच्या श्रीवर्धनी वाणाचे बियाणे पुरवठा करण्यासाठी आपण इच्छूक असल्यास आपले दरपत्रक सिलबंद पाकिटातून निम्नस्वाक्षरीकार यांच्या नावे दिनांक:– 24/2/2022 पूर्वी/पर्यंत कृपया पाठवावे.

| अ.क्र. | खरेदीचा तपशील | खरेदी करावयाचे अंदाजे प्रमाण |
|---|---|---|
| १ | सुपारी पिकाच्या श्रीवर्धनी वाणाचे बियाणे | १०,००० नग |

१. दरपत्रकात सर्व करांचा उल्लेख असावा.
२. पुरवठा करण्यात येणाऱ्या श्रीवर्धनी वाणाचे सुपारी बियाणे हे विदयापीठ रोपवाटिकेतून उचल करण्यात आलेल्या रोपांच्या मातृवृक्षाचेच असणे आवश्यक आहे. तसेच मातवृक्षांची सुपारी रोपे हि विद्यापीठ रोपवाटिकेतून खरेदी करण्यात आल्याची पावती सोबत जोडणे आवश्यक आहे.
३. पुरवठादाराची श्रीवर्धनी जातीची सुपारी मातृवृक्ष बाग विद्यापीठ शास्त्रज्ञांच्या समितीव्दारे प्रमाणित केलेली असणे आवश्यक आहे.
४. बंद पाकिटावर '**सुपारी पिकाच्या श्रीवर्धनी वाणाचे बियाणे खरेदी – रोपवाटिका**' असा उल्लेख करावा.
५. डाकघरद्वारे दरपत्रक मिळण्यास उशिर झाल्यास हे कार्यालय जबाबदार राहणार नाही.
६. कार्यालय कोणतेही कारण न देता आपल्या एकमेव स्वेच्छाधिकारावर हे दरपत्रक रद्द करण्याचा/मागे घेण्याचा/दुरूस्त करण्याचा किंवा नियत तारीख वाढविण्याचा अधिकार राखून ठेवीत आहे.

आपला विश्वासू,

सहयोगी संशोधन संचालक
प्रादेशिक फळ संशोधन केंद्र
वेंगुर्ला, जि. सिंधुदुर्ग

**प्रत: प्रसिध्दीसाठी रवाना**

१) मा. संचालक विस्तार शिक्षण, डॉ. बा.सा.को.कृ.वि., दापोली यांना विनंती करण्यात येते की, वरील दरपत्रक मसूदा विदयापीठाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करुन मिळावा.
२) मा. प्रमुख, कृषि तंत्रज्ञान माहिती केंद्र संकेत akmudbskkv@gmail.com स्थळावर प्रसिध्द करण्यासाठी.

Scanned with CamScanner